**(सोबत राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन अंतर्गत असलेल्या राज्य कार्यकारी समितीच्या दिनांक २ जून, २००५ रोजी झालेल्या पहिल्या बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत)**

**क्रमांक: ग्रापापु-१००५/प्र.क्र.८४/पापु-०७**
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ४ जून, २००५

प्रति,

१) मा.प्रधान सचिव (पा.पु.व स्व.) यांचे स्वीय सहाय्यक.
२) उप सचिव ( श्री.पतिंगे ), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३) विशेष कार्य अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
५) प्रकल्प व्यवस्थापक, जलस्वराज्य प्रकल्प, सिडको भवन, नवी मुंबई
६) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
७) उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
८) उप सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
९) उप सचिव, समाज कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१०) उप सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
११) उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१२) संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१३) संस्थीय व समाज विकास तज्ञ, जलस्वराज्य प्रकल्प, सिडको भवन, नवी मुंबई.
१४) आरोग्य व स्वच्छता तज्ञ, जलस्वराज्य प्रकल्प, सिडको भवन, नवी मुंबई.
१५) समाज विकास तज्ञ, जलस्वराज्य प्रकल्प, सिडको भवन, नवी मुंबई.
१६) माहिती, प्रचार व प्रसिध्दी तज्ञ, जलस्वराज्य प्रकल्प, सिडको भवन, नवी मुंबई.
१७) राज्य समन्वयक, संवाद व क्षमता विकास कक्ष, मुंबई.
१८) संचालक, आकाशवाणी, मुंबई केंद्र.
१९) संचालक, दूरदर्शन, मुंबई केंद्र.
२०) स्वयंशिक्षण प्रयोग, मुंबई.
२१) कक्ष अधिकारी (पापु-१६), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२२) निवडनस्ती (पापु-०७)

**(सुधाकर ज्ञा.बोबडे)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

D:\BACKUP WS07\year 2005\CR 84 Exe.comm.mtg 17.5.05.doc

## जोडपत्र- १

राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनच्या **कार्यकारी समितीच्या** दिनांक २ जून, २००५ रोजी झालेल्या पहिल्या बैठकीस उपस्थित सदस्यांची / अधिकाऱ्यांची यादी.

| अ.क्र. | अधिका-यांचे नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री.भि.ना.पतिंगे | उप सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२. |
| २ | श्री.र.वा.खरात | उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२. |
| ३ | श्री.ना.ना.भडीकर | उप सचिव, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२. |
| ४ | श्रीमती अ.उ.मोंडकर | उप सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२. |
| ५ | श्री.प्रविण दराडे | प्रकल्प व्यवस्थापक तथा प्रकल्प संचालक (उप सचिव अतिरिक्त कार्यभार), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२. |
| ६ | श्री.वसंत पोरेड्डीवार | संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे |
| ७ | श्री.हेमंत लांडगे | अधिक्षक अभियंता (समन्वय), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई |
| ८ | श्री.दि.दा.आढाव | अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२. |
| ९ | श्रीमती उषा माहेश्वरी | समाज विकास तज्ञ, जलस्वराज्य प्रकल्प, सिडको भवन, नवी मुंबई. |
| १० | श्री.मल्लिनाथ कलशेट्टी | राज्य समन्वयक, संवाद व क्षमता विकास कक्ष, मुंबई. |
| ११ | श्रीमती ज.ज.चेक्कला | संस्थीय व समाज विकास तज्ञ, मुंबई. |
| १२ | श्रीमती अश्विनी जठार | माहिती, प्रचार व प्रसिध्दी तज्ञ |
| १३ | श्रीमती जयश्री पंडीत | लेखा अधिकारी, जलस्वराज्य प्रकल्प, सिडको भवन, नवी मुंबई. |
| १४ | श्री.शैलेश माळोदे | कार्यक्रम अधिकारी (विज्ञान), आकाशवाणी, मुंबई केंद्र |
| १५ | श्री.उपमन्यु पाटील | स्वयंशिक्षण प्रयोग, मुंबई. |
| १६ | श्री.विनोद दासिमे | स्वयंशिक्षण प्रयोग, मुंबई. |
| १७ | श्री.ब.दि.उमाटे | कक्ष अधिकारी, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२. |
| १८ | श्रीमती शुभांगी आगाशे | कक्ष अधिकारी,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय,मुंबई-३२. |
| १९ | श्री.सुधाकर ज्ञा.बोबडे | कक्ष अधिकारी,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय,मुंबई-३२. |

---

## विषय- राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनच्या कार्यकारी समितीच्या गुरुवार दिनांक २.६.२००५ रोजी झालेल्या पहिल्या बैठकीचे इतिवृत्त

केंद्र शासन पुरस्कृत स्वजलधारा योजना व संपूर्ण स्वच्छता अभियान यांचे राज्य स्तरावरील संचालन, निधी वितरण, मार्गदर्शन, सनियंत्रण या बाबींच्या अनुषंगाने अपेक्षित कर्तव्ये व जबाबदारी पार पाडण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या राज्य स्तरावरील राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनच्या कार्यकारी समितीची पहिली बैठक गुरुवार दिनांक २ जून, २००५ रोजी सकाळी ११.३० वाजता मा. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झाली. या बैठकीस उपस्थित असलेल्या सदस्यांची / अधिकाऱ्यांची यादी जोडपत्र १ म्हणून सोबत जोडली आहे.

२. कार्यकारी समितीचे अध्यक्ष तथा मा. प्रधान सचिव यांचे व समितींच्या सदस्यांचे / अधिकाऱ्यांचे स्वागत करून बैठकीस सुरुवात झाली. विषयसुचीनुसार प्रत्येक विषयावर बैठकीत चर्चा होऊन पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात आले:

### विषय क्रमांक: १ : संवाद व क्षमता विकास कक्ष (Communication and Capacity Development Unit (C.C.D.U.))

कार्यवाही C.C.D.U.

(१) संवाद व क्षमता विकास कक्षामार्फत राज्य पातळीवरील कार्यशाळा यशदा, पुणे येथे C.C.D.U.मार्फत घेण्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली. यशदा या कार्यशाळेकरिता C.C.D.U. साठी प्रतिदिन, प्रतिव्यक्ती रुपये ७००/- दर आकारणार आहे. खास बाब म्हणून युनिसेफने ही कार्यशाळा पुरस्कृत केल्यास यशदा प्रतिदिन, प्रतिव्यक्ती रुपये ९००/- दर आकारणार आहे.

कार्यवाही C.C.D.U.

(२) पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रात वेगवेगळया अभिनव उपक्रमांची माहिती राज्यभरातून व इतर ठिकाणांहून प्राप्त होते. या माहितीचा उपयोग इतरांना होण्याच्या दृष्टीने संवाद व क्षमता विकास कक्षामार्फत "स्वच्छता साधना" हे द्वैमासिक प्रसिध्द करण्याचे प्रस्तावित असून यासाठीचा संपूर्ण खर्च युनिसेफ करणार आहे. हे "स्वच्छता साधना" द्वैमासिक काढण्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली.

कार्यवाही C.C.D.U.

(३) संवाद व क्षमता विकास कक्षाचे काम दिवसेंदिवस वाढत असून याकक्षासाठी दोन संगणक, दोन लॅपटॉप, १ डिजिटल कॅमेरा, १ हँडीकॅम व १ एल.सी.डी. प्रोजेक्टर खरेदी करण्याच्या प्रस्तावास कार्यकारी समितीने मान्यता दिली.

### विषय क्रमांक: २ : संपूर्ण स्वच्छता अभियान

(१) संपूर्ण स्वच्छता अभियानाच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार जिल्हास्तरावर स्वतंत्र कक्ष निर्माण करावयाचा असून सर्व जिल्हयांमधील या कक्षातील समाजशास्त्रज्ञ व स्वच्छता तज्ञ ही पदे भरण्यात आली असून शालेय स्वच्छता, आरोग्य शिक्षण व संनियत्रण सल्लागार तसेच संवाद व मानव संसाधन

विकास सल्लागार ही पदे अद्याप भरावयाची आहेत. जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत नुकत्याच घेण्यात आलेल्या मुलाखतींमध्ये निवड झालेल्या यादीतील पात्र उमेदवारांना गुणवत्तेनुसार माहिती, शिक्षण, संवाद, वैयक्तिक सल्लागार व क्षमता बांधणी, संनियंत्रण व मुल्यमापन, वैद्यकीय सल्लागार म्हणून नियुक्त करण्यास **कार्यकारी समितीने मान्यता दिली.** या वैयक्तिक सल्लागारांना त्यांच्या भविष्यातील कामगिरीनुसार मानधन देण्यात यावे. या सर्वच पदांचे वेतन व भत्ते यावरील खर्च संपूर्ण स्वच्छता अभियानाच्या मंजूर प्रशासकीय खर्चामधून भागवावयाचा आहे.

कार्यवाही
C.C.D.U.

(२) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार संवाद व क्षमता विकास कक्षासाठी दोन वाहने भाड्याने घेता येऊ शकतात. या वाहनांच्या भाड्याचा खर्च केंद्र शासनाने या कक्षासाठी मंजूर केलेल्या अनुदानातील प्रशासकीय खर्चामधून भागवावयाचा आहे. यापैकी एक वाहन आता भाडयाने घेण्यात आलेले आहे. आणखी एक वाहन भाडयाने घेण्यास **कार्यकारी समितीने मान्यता दिली.** सदर वाहन संपूर्ण स्वच्छता अभियान, स्वजलधारा कार्यक्रम व हागंदारीमुक्तता या कार्यक्रमांचा प्रचार, प्रसिध्दी करण्याच्या दृष्टीने सोईचे ठरु शकेल असे घेण्याचे ठरविण्यात आले.

**विषय क्रमांकः ३ : युनिसेफ केंद्रीत जिल्हे**

कार्यवाही
C.C.D.U.

युनिसेफच्या वतीने महाराष्ट्रातील नाशिक, नंदूरबार, सांगली, औरंगाबाद, उस्मानाबाद, यवतमाळ व चंद्रपूर या ७ जिल्ह्याची युनिसेफ केंद्रीत जिल्हे म्हणून निवड झालेली आहे. या प्रत्येक जिल्हयांमध्ये समाजशास्त्रज्ञ व स्वच्छता तज्ञ अशी दोन सल्लागार पदे नव्याने निर्माण करून कंत्राटी पध्दतीने भरण्यास युनिसेफने परवांनगी दिली असून या पदांवरील वेतन व प्रवासभत्त्याकरीता प्रत्येक पदासाठी रूपये १७,०००/- दर महा म्हणजे दोन पदांसाठी रुपये ३४,०००/- दरमहा इतके अर्थसहाय्य युनिसेफकडून मिळणार आहे. या अर्थसहाय्याच्या मर्यादेत प्रत्येक जिल्हयात दोन पदांऐवजी ३ पदे निर्माण करून भरण्याची संवाद व क्षमता विकास कक्षाची मागणी असून या प्रस्तावास युनिसेफनेही मान्यता दिली आहे. त्याप्रमाणे या ७ जिल्हयांमधील प्रत्येकी ३ पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यास **कार्यकारी समितीने मान्यता दिली.** सदर सल्लागारांची पदे जलस्वराज्य प्रकल्पात मुलाखती देऊन पात्र ठरलेल्या गुणवत्ता यादी मधील उमेदवारांच्या नियुक्तीने भरण्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली. या पदांवरील सल्लागारांना त्यांनी केलेल्या कामाच्या प्रगतीवरुन मानधन देण्यात यावे असे ठरले.

**विषय क्रमांकः ४ : स्वजलधारा कार्यक्रम**

कार्यवाही
C.C.D.U.

सन २००३-२००४ व २००४-२००५ या वर्षामध्ये राज्यातील एकूण १३३९ स्वजलधारा योजनांना मंजूरी देण्यात आलेली आहे. या योजनांच्या अंमलबजावणीमध्ये काही त्रुटी असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे या गावात ग्रामीण सहभागीय अवलोकन (PRA) करण्याची आवश्यकता असून त्यासाठी या गावांमध्ये सुक्ष्म नियोजन (Micro Planning) करणे आवशक आहे. हे काम स्वयंसेवी संस्था, यशवंत ग्राम, नेहरु युवा मंडळ, संवाद व क्षमता विकास कक्ष यांच्यामार्फत प्रशिक्षण देण्यात आलेल्या निम्न व्यावसायिकांमार्फत करावयाचे आहे. यासाठी रुपये ५०००/- प्रति गांव खर्च अपेक्षित असून सदर खर्च केंद्र शासनाने स्वजलधारा योजनेसाठी गावात क्षमता निर्मिती करणे, प्रारंभिक कामे, योजनांचे सनियंत्रण इत्यादींसाठी दिलेल्या निधीतून करण्यास **कार्यकारी समितीने मान्यता दिली.** त्यानुसार आवश्यक निधी संबंधित गावांना त्वरित मुक्त करावा असेही बैठकीत ठरविण्यात आले.

**मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी घेण्यात आलेले विषयः**

**(१) स्वच्छता दूत पुस्तकाच्या प्रती छापण्यास मान्यता**

कार्यवाही
C.C.D.U.

**शालेय स्वच्छता व आरोग्य शिक्षण** हा संपूर्ण स्वच्छता अभियानाचा एक महत्वाचा घटक आहे. प्रत्येक शाळेतील एका शिक्षकास याबाबत प्रशिक्षण दयावे असे संपूर्ण स्वच्छता अभियानाच्या मार्गदर्शक सूचनात नमूद करण्यात आले आहे. याबाबत **स्वच्छता दूत** या नावाची मार्गदर्शक पुस्तिका तयार करण्यात आली असून तिच्या ७५,००० प्रती छापून घेण्यास **कार्यकारी समितीने मान्यता दिली.** या प्रती सर्व जिल्ह्यांना वितरीत करण्यात येणार आहेत. या पुस्तिका छपाईचा खर्च संपूर्ण स्वच्छता अभियानाच्या आय.ई.सी. मधून करण्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली.

**(२) स्वजलधारा व संपूर्ण स्वच्छता अभियान कार्यक्रम राबविण्यासाठी राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनला केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीतून होणाऱ्या खर्चाच्या लेखा परीक्षणासाठी सनदी लेखापालांची नियुक्ती करण्याबाबत.**

कार्यवाही
पापु-०७

वरील विषयाबाबत चर्चेअंती समितीने ठरविले की, महालेखापालांच्या पॅनेलवरील सनदी लेखापालांची यादी मागविण्यात यावी व या यादीतून योग्य सनदी लेखापालांची निवड करण्याचे अधिकार उप सचिव व संचालक, आर. एस. पी. एम. यु. यांना प्रदान करण्यात आले.

मा. अध्यक्षांचे व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपली.

***********